## निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय
## जनता सहकारी बँक लि., पुणे (मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
द्वारा – उपनिबंधक (नागरी बँका), सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
तिसरा मजला, मध्यवर्ती इमारत, पुणे–४११ ००१
ईमेल – comm.urban@gmail.com

# सभासद अंतिम मतदार यादी सूचना

बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूक सन २०२२ ते २०२७ प्रक्रियेअंतर्गत मल्टिस्टेट को–ऑप. सोसायटीज ॲक्ट, २००२, बँकेचे उपविधी आणि बँकेने तयार केलेले निवडणूक नियम यास अधिन राहून **दि. ३१/१२/२०२१ अखेरची** सभासद प्रारुप मतदार यादी बँकेने दि. २७ मे २०२२ रोजी प्रसिध्द केली होती. सदरच्या प्रारुप मतदार यादीबाबत हरकती / दुरुस्ती / संस्था प्रतिनिधी ठराव इ. बँकेकडे दि. ६ जून २०२२ पर्यंत सादर करण्याबाबत सर्व सभासदांना कळविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या हरकती, दुरुस्तीसाठीचे अर्ज, संस्थांचे प्रतिनिधी ठराव इ. वर निर्णय घेऊन मी आज दि. १० जून २०२२ रोजी **आनंद अ. कटके, निवडणूक निर्णय अधिकारी,** जनता सहकारी बँक लि., पुणे तथा उपनिबंधक (नागरी बँका) **बँकेच्या सभासदांची अंतिम मतदार यादी** प्रसिध्द करीत आहे.

जे सभासद स्वत: थकबाकीदार असतील किंवा ज्या कर्जदारास जामीनदार असतील व तो कर्जदार थकबाकीदार असेल अशा सभासदांना बँकेने स्वतंत्र पत्राद्वारे कर्जखाते अद्ययावत करणेबाबत कळविले आहे. त्याआधारे ज्यांनी दि. ३१ मे २०२२ अखेर कर्जखाते नियमित केले आहे, अशा सभासदांचा समावेश सदरच्या अंतिम मतदार यादीमध्ये करण्यात आला आहे, याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

सदरची अंतिम मतदार सभासद यादी माझ्या उपरोक्त कार्यालयात, बँकेच्या मुख्य कार्यालयात व सर्व शाखा कार्यालयांमध्ये सभासदांना पाहण्यासाठी उपलब्ध आहे. सदरच्या अंतिम मतदार यादीनुसारच यापुढील निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे, याची सभासदांनी नोंद घ्यावी.

सदरची अंतिम मतदार यादी बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये विक्रीकरीता (फक्त सभासदांचे उपयोगासाठी) उपलब्ध आहे. तसेच बँकेच्या उपविधीची प्रत व निवडणूक नियमावलीची प्रत देखील सभासदांना बँकेच्या मुख्य कार्यालयातून विकत घेता येईल. याकरिता बँकेच्या सेक्रेटरीयल विभागात (मुख्य कार्यालय–१४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव रस्ता, पुणे – ४११ ००२) बँकेच्या कामकाजाच्या वेळात स्वतंत्रपणे अर्ज करुन व बँकेकडे रक्कम जमा करुन मिळू शकेल.

Janata Sahakari Bank Ltd. Pune (BOD Election 2022) * Returning Officer

**आनंद अ. कटके**
निवडणूक निर्णय अधिकारी – जनता सहकारी बँक लि., पुणे
तथा उपनिबंधक (नागरी बँका), सहकार आयुक्त कार्यालय, पुणे

**ठिकाण –पुणे**
**दि. ९ जून २०२२**